MHPU230001232015

## न्या य नि र्ण य

## (घोषीत दिनांक ०७ मार्च, २०२६)

**०१.** अभियोगपक्षाने अभिलेखावर आणलेला लेखी व तोंडी पुरावा, तसेच सहा. सरकारी अभियोक्ता व बचावपक्षाच्या विधीज्ञांच्या युक्तीवादावरुन पुढील प्रमाणे मुद्दे न्यायनिर्णयासाठी उपस्थित झाले असून त्यावरील निष्कर्ष मी कारणांसह खाली नमूद करीत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, दिनांक १८/०६/२०१४ रोजी ११.४५ वाजण्याच्या दरम्यान खरपुडी फाटा ता, खेड, पुणे आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन क्र.एम.एच.१४ डीएफ ५०२८ ही भरधाव वेगाने, हयगईने व अविचाराने, मानवी जिवीत धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला गंभीर दुखापत अगर क्षती पोहचण्याचा संभव असेल अशा पध्दतीने चालवली आणि त्याने भारतीय दंड विधान २७९ अन्वये गुन्हा केला ? | **नाही.** |
| २. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, हयगईने व अविचाराने व निष्काळजीपणाने चालवून दिपक लांडगे यांना धडक | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| | देवून जखमी केले आणि त्याने भारतीय दंड विधान ३३७ अन्वये गुन्हा केला ? | |
| ३. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, हयगईने व अविचाराने व निष्काळजीपणाने चालवून दिपक लांडगे यांना धडक देवून गंभीर जखमी केले आणि त्याने भारतीय दंड विधान ३३८ अन्वये गुन्हा केला ? | **नाही.** |
| ४. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याचे ताबेतील वर नमुद वाहन भरधाव वेगाने, हायगयीने निष्काळजीपणे व रस्त्याच्या परिस्थितीकडे व नियमांकडे दुर्लक्ष करून चालवली आणि त्याने मोटारवाहन कायदा कलम १८४ अन्व्ये गुन्हा केला? | **नाही.** |
| ५. | अंतीम आदेश काय ? | **आरोपीस निर्दोष मुक्त केले .** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**०२.** आरोपी विरुध्द ठेवण्यात आलेले आरोप शाबीत करण्यासाठी सरकारपक्षाने एकूण २ साक्षीदार तपासले. अ.सा.क्र.१ – वर्दीदार दिपक रामु लांडगे यांची साक्ष नि.क्र.२०, अ.सा.क्र.२ वसंत निजामा पठारे यांची साक्ष नि.क्र.२३कडे नोंदवण्यात आल्या. तसेच अभियोगपक्षातर्फे वर्दी जबाब नि.क्र.२७, घटनास्थळ पंचनामा नि.क्र.२४, वाहन जप्ती पंचनामा नि.क्र. २५ या कागदोपत्री पुराव्यावर भिस्त ठेवली.

## मुद्दा क्र. १ ते ५ करीताः–

०३. मुद्दा क्रमांक १ ते ५ हे परस्परांशी संबंधीत असल्याने त्याची कारणमिमांसा ही एकत्रित केली आहे.

०४. साक्षीदारांच्या पुराव्याची चर्चा सुरु करण्यापुर्वी भारतीय दंड विधान, १९६० च्या कलम २७९ सिध्द होण्याकरीता कोणत्या बाबी कायद्याने आवश्यक असतात हे पाहणे गरजेचे आहे. भारतीय दंड विधान,१९६० च्या कलम २७९ मध्ये बेदरकारपणे किंवा हयगयीने चालक त्याच्या ताब्यातील वाहन रस्त्यावर चालवुन मनुष्याच्या जीवनास क्षती पोहाचवित असतो. विविध न्यायनिवाडयमध्ये 'बेदरकारपणा' व 'निष्काळजीपणा' यांच्या विविध व्याखा दिलेल्या आहेत. 'बेदरकारकपणे किंवा निष्काळजीपणे वाहन चालविणे' म्हणजे काय याचा अर्थ खालील प्रमाणे – "निष्काळजीपणा याचा अर्थ जे कर्तव्य करायला पाहिजे ते न करणे, बेदरकारकपणे याचा अर्थ जी गोष्ट करायला नाही पाहिजे ती करणे"

०५. वरील कायद्याच्या आवश्यक बाबी लक्षात घेवून वरील नमूद साक्षीदारांच्या पुराव्याची चर्चा करणे आवश्यक आहे.

०६. या कामी अभियोगपक्षाने तपासलेल्या साक्षीदारांपैकी सा.क्र.१ दिपक लांडगे यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दि.१८/०६/२०१४ रोजी ८.१५ वा. च्या सुमारास खरपुडी फाटयावर ते व त्यांची बहीण वंदना दुचाकीने जात होते. लघुशंकेसाठी त्यांनी गाडी रस्त्याच्या कडेला उभी केली असता पाठीमागून येणाऱ्या वेगनॉर गाडी क्र. एमएच १४ डीएफ ५०२८ ने त्यांच्या गाडीला धडक दिली त्यामुळे ते बेशुध्द झाले. चार दिवसानंतर त्यांना शुध्द आली. त्यांना डोक्याला, छातीला व मनक्याला मार लागला होता. गाडी आरोपी चालवित होता. उलटतपासामध्ये

घटनास्थळाचा रस्ता वर्दळीचा असल्याचे व अपघातानंतर बेशुध्द झाल्यामुळे कोणते वाहन होते हे त्यांनी पाहिले नसल्याचे त्यांनी मान्य केले.

०७. अ.सा.क्र.२ वसंत निजामा पठारे यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांनी सदर गुन्हयाचा तपास केला. तपासात त्यांनी घटनास्थळ पचंनामा केला. साक्षीदारांचे तपास टीपण नोंदविले. अपघातातील वाहनाचा पचंनामा केला. आरोपीस नोटीस दिली. त्यांच्या चौकशीमध्ये आरोपीच्या चुकीने अपघात झाल्याचे निष्पन्न झालयाने त्यांनी आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. त्यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये पंच सोडून इतर साक्षीदार त्यांचे नातेवाईक आहेत व त्यांनी प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराचे जबाब नोंदविले नाही हे मान्य केले.

०८. अभियोगपक्षातर्फे सादर करण्यात आलेल्या एकंदरित पुराव्याचे अवलोकन केले. अभियोग पक्षातर्फे केवळ २ साक्षीदार तपासले आहेत. अ.सा.क्र.१ दिपक लांडगे हे जखमी साक्षीदार आहेत. त्यांनी सरतपासामध्ये वर नमुद वाहन त्यांची दुचाकी रस्त्याच्या कडेला उभी असताना त्यांना धडक दिवून अपघात केल्याचे सांगितले आहे. त्यांनी आरोपीस ओळखतो असेही सांगितले आहे. परंतु उलटतपासामध्ये अपघातानंतर ते बेशुध्द झाले त्यामुळे अपघातातील वाहन कोणते होते हे पाहिले नसल्याचे मान्य केले आहे. तथापि, सदर साक्षीदाराच्या पुराव्यावरुन त्यांचा अपघात झाला हे मान्य केले तरी तो अपघात आरोपीने सदर वाहन चालविल्यामुळे झाला आहे याबाबत संशय निर्माण होतो.

०९. महत्वाचे म्हणजे सदर जखमी साक्षीदाराच्या पुराव्यास इतर पुराव्याने दुजोरा मिळालेला नाही. तपासी अंमलदार यांचा पुरावा औपचारिक स्वरुपाचा आहे. घटनास्थळ पंचनामा हा अपघातानंतर ३ दिवसांनी केलेला आहे व त्यावेळी जागेवर वाहनेदेखील नव्हीत. त्यामुळे घटनास्थळ पंचनाम्याचा अपघात कसा घडला होता हे

निर्देशीत करण्यासाठी काहीही उपयोग होणार नाही. अपघातातील वाहन हे आरोपीच चालवित होता तसेच अपघात आरोपीच्या निष्काळजीपणामुळे झालेला हे निर्वीवादपणे उपलब्ध पुराव्यावरुन म्हणता येणार नाही. सबळ पुराव्याअभावी आरोपीविरुध्द कोणताही गुन्हा विनासंशय सिध्द होत नसल्याने आरोपी प्रस्तुत आरोपातून संशयाचा निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतो. सबब मी मुद्दा क्र.१ ते ४ चे उत्तर नकारार्थी देवून मुद्दा क्र.५ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. आरोपीस भारतीय दंड संहिता कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हयासपात्र असलेल्या आरोपातून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७१(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे या कामातील जामीन बंधपत्र विसर्जित करण्यात येत असून जामीनदारास मुक्त करण्यात येत आहे.

३. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८१ अन्वये रक्कम रु. १५,०००/-(रुपये पंधरा हजार मात्र) चा सहा महिन्यांच्या कालावधीकरीता जामीन द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित केला.)

SWATI BHASKAR NAIKNAVARE

Digitally signed by SWATI BHASKAR NAIKNAVARE
Date: 2026.03.07 15:20:46 +0530

खेड. **(स्वाती भा.नाईकनवरे-गरड)**

दिनांक ०७/०३/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,न्यायालय क्र.१,

खेड.